| MHST080000512015 | **रे. दि. मु. क्रमांक १३/२०१५**<br>**श्री. रामचंद्र हरिबा रासकर वगैरे विरुध्द श्री. विलास विष्णू राऊत वगैरे** |
|---|---|

## नि. क्र. २९ खालील आदेश.
## आदेश पारित दिनांक ०९.१०.२०२४

सदरचा अर्ज वादीचे वारस यांचे तर्फे वादी नं. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला उशीर माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादीचे वारसांनी कथन केलेले आहे की, सदर कामातील वादी नं. २ श्री. भिमराव हरिबा रासकर हे दिनांक १८/०८/२०२० रोजी मौजे मरिआईचीवाडी येथे वृद्धापकाळामुळे मयत झालेले आहेत. त्यांना वारस मुले आहेत. सदरची दुरुस्ती अगर वारस रेकॉर्डवर घेणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीचे वारस यांना मुदतीत म्हणजे ९० दिवसांचे आत रेकॉर्डवर घेता आलेले नाहीत कारण घरगुती अडचणींमुळे वडीलांचे मृत्यूचा उतारा घेऊन वेळेत वकीलांची भेट घेऊन कागदपत्रे व माहिती देता आलेली नाही. तरी परंतु सदरचे वारस रेकॉर्डवर घेणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. तरी ते वारस रेकॉर्डवर घेणेचा आदेश होवून तशी दाव्यातील सरनाम्यात दुरुस्ती करणेस परवानगी असावी. सदर दुरुस्तीमुळे मूळ दाव्याच्या स्वरुपात अगर मागणीत काहीही बदल होत नाही. तरी, सदरची दुरुस्ती योग्य व कायदेशीर अशीच आहे. तरी सदरची दुरुस्ती करणेस परवानगी असावी. सोबत वादीचे मृत्यूचा उतारा कागदयादीने दाखल केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर व्हावा ही नम्र विनंती.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ३८ वर आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीनुसार, वादी नं. २ चे वारस यांचे वतीने दिलेला अर्ज

धादांत खोटा, लबाडीचा, मुदतबाहय व बेकायदेशीर असून त्यास या प्रतिवादीची सक्त हरकत आहे. दावा सन २०१५ सालातील असून वादी प्रतिवादी हे एकमेकांचे नात्यातील आहेत. दावा हा केवळ प्रतिवादी बहिणींचा हक्क नाकारण्यासाठी त्यांनी व्यवहार केले खरेदीदार यांना त्रास देण्यासाठी केला आहे, त्यामुळेच दाव्याची माहिती मुळ वादी तसेच त्यांची मुले, वारस, कुटूंबिय यांना सुरवातीपासून आहे. सन २०१५ सालापासून मुळवादी यांनीच दाव्याचे कामकाज तत्पर चालवले नाही. दावा चालण्यासाठी आवश्यक तजवीज केली नाही, असे असताना मुळ वादी हे सन २०२० मध्ये मयत आहेत. त्यांचे मृत्यू पश्चात मुळात वारसांना दाव्यामध्ये रस नसल्याने ,माहिती असूनही कोणीही वारस नोंदीसाठी अर्ज देणे, दाव्याचे कामी हजर राहणे असे काही केले नाही. त्यामुळे आता हा उशीरा माफीचा अर्ज देणे प्रामाणिक नाही. अर्जातील मजकूर खोटा आहे, उशीरा माफीसाठी एकही संयुक्तीक कारण दिलेले नाही, घुरगुती अडचण काय हे नमूद नाही केले नाही, किती कालावधीचा विलंब हे नमूद नाही. अशाप्रकारे खअर्ज हा पोकळ व खोटया कारणाने दिला असून, विशेषतः कायदेशीर तरतुदी, न्यायप्रक्रिया, मे. कोर्टाचेअधिकार गृहित धरुन व विशेषतः काहीही अर्ज, कधीही, कोणत्याही योग्य तपशील खुलाशाशिवाय दिला आहे, उशीरा माफीसाठी योग्य व संयुक्तीक कारण नमूद नसल्याने खर्च व दंडासह फेटाळून लावण्यात यावा.

०४. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे व सदर अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात आणण्याकरिता दोन्ही पक्षांना संधी देणे सदर दाव्याचा निकाल गुणवत्तेवर देण्याच्या दृष्टीने योग्य वाटते. नमूद वादी यांचे वारस रेकॉर्डवर येण्याने वादींचे काहीही नुकसान होणार नसून प्रस्तुत दाव्याचा गुणावगुणावर निर्णय होण्यास मदतच होणार आहे. याउलट वारस रेकॉर्डवर न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल व त्यांच्यावर अन्याय होईल, तसेच वादी यांना दाव्याचे कामी आपला बचाव मांडता येणार नाही.

मात्र वादीने उशीरा माफीसाठी अर्जात दिलेले कारण संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे दावा लांबणीवर पडलेला आहे. त्यामुळे, त्यांचेवर कॉस्ट लावणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादी वारसांचा निशाणी क्र. २९ चा अर्ज रक्कम रुपये २०००/- चे कॉस्टवर मंजूर करणेत येतो. |
| २. | सदरची कॉस्ट ही वादी नं. २ चे वारसांनी प्रतिवादींना देण्यात यावी. |
| ३. | वादी नं. २ चे वारसांना पटलावर घेणेसाठी झालेला उशीर माफ करणेत येतो. |
| ४. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.10.11 16:49:52 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
खंडाळा, जि. सातारा

दिनांकः- ०९.१०.२०२४

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खंडाळा

लघुलेखकाचे नाव – सौ. सुवर्णा संकेत शिंदे

स्वाक्षरीत/-
(एस. एस. शिंदे)
लघुलेखक (ग्रेड – ३)